# प्रकरण सहावे

# उपसंहार

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

## प्रकरण सहावे

# उपसंहार

''मृणालिनी देसाई यांच्या 'पुत्र मानवाचा' या कादंबरीचा विवेचक अभ्यास'' प्रस्तुत लघु-शोध-प्रबंधात केला आहे. तो अधिकाधिक वस्तुनिष्ठ व व्यापक कसा होईल याकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले आहे. 'उपसंहार' मध्ये सारांश रूपाने सर्व प्रकरणांचा आढावा घेतला आहे.

## प्रकरण पहिले

'मराठी कादंबरी उदय आणि विकास' या पहिल्या प्रकरणामध्ये एकूणच मराठी कादंबरी वाङ्मयाचा उदय, विकास व व्याख्या यांचा अभ्यास मांडण्याचा प्रयत्न आहे. मराठी साहित्यामध्ये कादंबरी विश्व कसे समृद्ध होत गेले याचा विचार केला आहे. 'पाश्चात्य' साहित्याच्या अनुषंगाने मराठी साहित्यात कादंबरी वाङ्मय आपले अस्तित्त्व निर्माण करू लागले. 'ॲरिस्टिडी' याने लिहिलेली 'मलेशिका' हिच पहिली कादंबरी म्हणावे असे प्रतिपादन झालेले दिसते. यानंतर अनेक कादंबऱ्या पाश्चात्य साहित्यात निर्माण झाल्या.

कादंबरी साहित्याच्या पूर्वपीठिकेबरोबरच या प्रकरणामध्ये अनेक समीक्षकांनी कादंबरीच्या केलेल्या व्याख्या मांडल्या आहेत व स्वरुपाविषयी विस्तृत विवेचन केले आहे. कादंबरी म्हणजे काय ? याविषयी श्री. ना. पेंडसे म्हणतात, ''कादंबरी म्हणजे जीवनप्रवाहाचा सलग स्वयंपूर्ण छेद असतो.''

मराठी कादंबरीचा उदय व विकास होत असताना काही कालखंड आपोआप पडत गेले. इ. स. १८०० ते इ. स. १८७४ या आरंभ काळात 'हरि केशवजी पठारे' यांच्या 'यात्रिकीक्रमण' या भाषांतरित कादंबरीने खरा प्रवाह निर्माण केला. 'बाबा पद्मनजी' यांच्या 'यमुनापर्यटन' या कादंबरीने पायाच घातला. हरिभाऊ आपटे यांनी मराठी

कादंबरीला कलात्मक आणि बोधात्मक ऐश्वर्य प्राप्त करून दिले. तर फडके - खांडेकर यांनी स्वप्नरंजनात गुरफटून टाकले. मराठी कादंबरीच्या विश्वात अनेक कादंबरीकारांनी आपले योगदान दिले, यामुळेच विकासाच्या दृष्टीने विविध कालखंड पडण्यास सुरुवात झाली.

मराठी कादंबरीत विविध प्रवाह निर्माण झाले. त्यामध्ये पौराणिक कादंबरी, ऐतिहासिक कादंबरी, सामाजिक कादंबरी, अद्भुतरम्य कादंबरी, राजकीय कादंबरी, ग्रामीण कादंबरी, दलित कादंबरी व चरित्रात्मक कादंबरी उदयाला आली. मराठीतील चरित्रात्मक कादंबरीच्या वाटचालीत १९५० ते १९७५ चा कालखंड महत्त्वाचा वाटतो. याच काळात ऐतिहासिक व्यक्तीवरती कादंबऱ्या लिहिल्या गेल्या. यामध्ये 'स्वामी' या कादंबरीने एक परंपराच निर्माण केली. समकालीन व्यक्तींच्या जीवनावरती अनेक कादंबऱ्या लिहिल्या गेल्या. या काळात टिळक, गांधीजी, सावरकर, भगतसिंह यांच्यावर अनेक चरित्रपर कादंबऱ्या लिहिल्या गेल्या. याचा आढावा या प्रकरणात घेतला आहे.

## प्रकरण दुसरे

'मृणालिनी देसाई' यांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व' या दुसऱ्या प्रकरणामध्ये लेखिकेचा थोडक्यात परिचय करून घेतला आहे. मृणालिनी देसाई यांनी अनेक विषयावर कथा आणि कादंबरी लेखन केले आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर म. गांधी यांचा प्रभाव पडलेला दिसून येतो. त्यांच्या साहित्यामध्येही याचा प्रत्यय येतो. लहान वयापासून त्यांनी स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभाग घेतला होता. उदारता, व्यापक दृष्टिकोन, मातृभक्ती, स्वदेशप्रीती इत्यादी गुण त्यांच्या व्यक्तिमत्त्वात व वाङ्मयात अविष्कृत झाले आहेत. आपल्या आयुष्यामध्ये त्यांनी वेगवेगळ्या विषयांवर पुस्तके लिहिली.

गांधीजींच्या जीवनावर स्वातंत्र्यलढ्याचे केंद्र धरून त्यांनी 'पुत्र मानवाचा' ही कादंबरी लिहिली. त्यांचे साहित्य विविध अंगांनी नटलेले आहे. त्या स्वतः ध्येयवादी व

लढाऊ वृत्तीच्या होत्या. त्यांना अनेक वेळा तुरुंगवास भोगावा लागला. हेच त्यांच्या साहित्याचे व व्यक्तिमत्त्वाचे मर्म आहे. त्यांचे साहित्य काकासाहेब कालेलकर यांच्या वाङ्मयाशी नाते सांगून जाते. गांधीजींच्या विचाराने प्रेरित होऊन म. गांधींचे चरित्र संक्षेपाने का होईना वाचकांना माहीत व्हावे म्हणून लेखिकेने मानवतेची महन्मंगल गाथा सांगणारी 'पुत्र मानावाचा' ही कादंबरी लिहून मराठी वाङ्मयात मोलाची भर घातली. त्यांचे वाङ्मयीन मूल्य निश्चितच मोठे आहे. लेखिकेची जडणघडण, देशप्रेम, साहित्यिक कर्तृत्व याचा परामर्श येथे घेण्याचा प्रयत्न केला आहे.

## प्रकरण तिसरे

'पुत्र मानवाचा' या कादंबरीचे अंतरंग प्रकरणात कादंबरीचा आशय थोडक्यात सांगितलेला आहे. 'पुत्र मानवाचा' या कादंबरीमध्ये महात्मा गांधीजींच्या जीवनातील उत्तरार्धाचा भाग येतो. 'मी' निवेदकाच्याद्वारे गांधी चरित्राचा अंश उलगडत जातो. भारतीय लोकमानसावर पडलेला गांधी विचारांचा प्रभाव आणि ब्रिटिश शासनाशी दिलेला लढा याची कथा यामध्ये येते. गांधीजींनी असहकार, चळवळ, सत्याग्रह, स्वदेशी या मूल्यांची जपणूक केलेली दिसून येते. या कादंबरीतील कथानकात सलगता दिसत नाही. कादंबरीचे कथानक निवेदनात्मक आहे. 'मृणालिनी देसाई' आपल्या विचारांच्या अभिव्यक्तीला महत्त्व देतात. कथानक वेगवेगळ्या घटना प्रसंगाद्वारे आपल्या समोर येते. प्रसंगाची मालिका मिळून एक कथानक बनते. कादंबरीच्या कथानकातून लेखिकेचे गांधीजींच्या विचारांवर असलेले प्रेम प्रकट होते.

कादंबरीमध्ये असलेल्या अनेक व्यक्तिरेखा क्रांतीच्या मार्गाने जाऊन साऱ्या जगात क्रांती व्हावी असा विचार मांडतात. गांधीजींच्या नेतृत्त्वामुळे सर्व देशाला स्वातंत्र्य मिळेल, त्यांच्या आदर्शाला आपलेसे केले पाहिजे असा आदर्श व्यक्तिरेखा जोपासतात. गांधीजींचे विचारदर्शन व जीवनमूल्ये समाजास कसे पूरक ठरतात याचा परिचय त्यांच्या व्यक्तिमत्त्वामुळे होतो. आजच्या युगात काही जीवनमूल्यांचा ऱ्हास होताना दिसतो व

अराजकता बोकाळलेली दिसते. यावरती नेहमीच गांधीविचार व त्यांची मूल्ये आदर्श ठरतील हेच अंतरंगामध्ये दिसून येते.

कादंबरीतील वातावरण स्वातंत्र्यपूर्वीचे असल्यामुळे राजकीय, सामाजिक घटना गांधीचरित्राद्वारे मांडले आहेत. कादंबरीमध्ये संघर्षाची बीजे वेळोवेळी दिसून येतात. गांधीजींनी स्वकियांशी व इंग्रजांशी केलेला संघर्ष कादंबरीत कशा पद्धतीने चितारला आहे याचा आढावा घेतलेला आहे. गांधीजींवर लोकांचा दृढ विश्वास होता. गांधीजींचे नेतृत्व सर्वांनी स्वीकारलेले होते. त्यांच्या कार्यातून, विचारातून एक महात्म्याचे दर्शन होते. इंग्रजी शासनाला वेळोवेळी संपूर्ण स्वातंत्र्य मागणारे गांधीजी सत्याग्रहाचा खडतर मार्ग स्वीकारत असत. लोकांच्यामध्ये आदर्शमूल्ये निर्माण करण्याचा गांधीजींचा प्रयत्न होता. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी म. गांधींनी जे मार्ग अवलंबिले त्यांचा थोडक्यात आढावा या प्रकरणात घेण्यात आला आहे.

### प्रकरण चौथे

'पुत्र मानवाचा' या कादंबरीतील चौथ्या प्रकारणात वाङ्मयीन दृष्टिकोनातून वैशिष्ट्ये आणि गांधीवादी विचारसरणी कशी होती. गांधीवादाची असणारी गरज यांचा विचार केला आहे. गांधीजींच्या शब्दाला सोन्याचे मोल होते, समाजातील दुफळी या विचारामुळे कशी दूर होतात. गांधीवादामुळे समाजाचा होणारा उत्कर्ष त्याचबरोबर गांधीजींची असणारी दूरदृष्टी यांचा या प्रकरणात अभ्यास मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

'पुत्र मानवाचा' या कादंबरीतील सामाजिक, राजकीय व ग्राम जीवनदर्शन हे स्वातंत्र्यापूर्वीचे आहे. त्यामुळे त्यात सजीवता आलेली दिसते. ग्रामीण व शहरी समाजात असलेली दुफळी येथे स्पष्ट होते. राजकीय जीवनामध्ये हिंदुस्थानची होणारी पिळवणूक, म. गांधीजींचे नेतृत्व मिळाल्यानंतर झालेला बदल नवी दृष्टी देणारा असा होता. ग्रामीण जीवनामध्ये अराजकता दिसते. गांधीजींच्या शब्दाला उचलून धरणारा समाज ग्रामीणच होता. म्हणूनच गांधीजींचा मूलमंत्र 'खेड्याकडे चला' असा होता.

कादंबरीची पार्श्वभूमी वास्तव रुपाने समोर येते. तिच्यात येणारे प्रसंग वास्तव वाटतात तर कधी कल्पित भासतात. तरीही कादंबरीला मोल प्राप्त होते. स्वातंत्र्यपूर्व परिस्थितीचे यथार्थ दर्शन आपणास घडते. म. गांधीजींचे प्रयत्न वास्तवाला जपणारे दिसतात. आपल्या देशाला पारतंत्र्याच्या बेडीतून मुक्त करण्यासाठी गांधींजींबरोबर अनेक थोर नेत्यांनी प्रयत्न केले व प्रसंगी आपल्या प्राणांची आहुतीदेखील दिली. देशहितासाठी अनेक जणांनी पुढाकार घेतला. अशा अनुभवांचे विश्व सत्य वाटते.

मृणालिनी देसाई यांची भाषाशैली ही सुबोध, ओघवती, अर्थवाही व रसपूर्ण आहे. प्रसंग विशेषी संबंधित कविता मधून-मधून पेरण्याचा त्यांना छंद आहे. वाक्यरचना वैशिष्ट्यपूर्ण आहे. या त्यांच्या तेजस्वी भाषाशैलीमुळे त्यांची कादंबरी प्रभावी वाटते. 'पुत्र मानवाचा' हे शीर्षक, समाजकल्याणाच्या जाणिवेने स्वत: झगडणाऱ्या म. गांधीजी या महामानवाला योग्य ठरते व हे शीर्षक यथायोग्य आहे. या सर्व बाबींचा आढावा प्रस्तुत प्रकरणात घेतला आहे.

**प्रकरण पाचवे**

प्रस्तुत प्रकरणात 'पुत्र मानवाचा' या कादंबरीतून प्रगट होणारे गांधीजींचे जीवनदर्शन व तत्त्वज्ञान याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. म. गांधीजींनी आपले संपूर्ण आयुष्य समाजकल्याणासाठी अर्पण केले. त्यांचे व्यक्तिमत्त्व व प्रखर राष्ट्रवाद मांडला आहे. म. गांधीजींना लोकांनी जिवंतपणीच महात्मा ही उपाधी दिली होती. स्वातंत्र्य मिळवण्यासाठी सत्य, अहिंसा, सत्याग्रह, स्वदेशी या मार्गाचा त्यांनी अवलंब केला व स्वत:च्या आचरणाने राष्ट्रवादी भावना जपण्याचा प्रयत्न केला. म. गांधीजींच्या विचारांचा जनमानसाच्या मनावर प्रभाव कसा होता हेच सांगण्याचा प्रयत्न प्रकरणात केला आहे.

कादंबरीच्याद्वारे म. गांधीजींच्या समकालीन सहकाऱ्यांचा देशसेवा हाच धर्म होता. त्यांच्या विचारांना, कार्याला मानणारा समाज होता. जर या लोकांच्या कार्याचा

उल्लेख केला नाही तर इतिहास माफ करणार नाही, अशा थोर नेत्यांचे कार्य प्रस्तुत प्रकरणात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

जी मूल्ये व्यक्तींचे जीवन सुखकर, आदर्शमय बनवतात व व्यक्तीच्या अंगी चिरकाल टिकतात आणि सत्य असतात, अशा शाश्वत मूल्यांचा परामर्श या प्रकरणात घेतला आहे व शेवटी 'पुत्र मानवाचा' या कादंबरीतून समाज मनावर, वाचकांवर, कादंबरीतील घटनांवर, प्रसंगावर, पात्रांवर झालेला प्रभाव व दूरगामी परिणाम मांडला आहे.

अशा प्रकारे वरील पाच प्रकरणामध्ये मृणालिनी देसाई यांच्या 'पुत्र मानवाचा' या कादंबरीचा विवेचक अभ्यास करण्यात आला आहे. त्याचबरोबर प्रत्येक प्रकरणांच्या शेवटी वापरलेल्या संदर्भ ग्रंथांची सूची दिली आहे.

प्रस्तुत प्रकरण सहामध्ये वरील पाच प्रकरणांचा निष्कर्ष मांडला आहे. व वापरलेल्या संदर्भ ग्रंथाचा तपशील 'संदर्भ सूची' मध्ये दिला आहे. अशा प्रकारे 'पुत्र मानवाचा' या कादंबरीचा विवेचक अभ्यास करण्याचा अल्पसा प्रयत्न केला आहे.